# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१३.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या संपूर्ण काळात सतत मन व बुद्धीवर ताबा ठेवून अत्यंत सावधानतेने आचरण करावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. तुलनात्मक दृष्ट्या गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने या महिन्याच्या पूर्वार्धातील प्रथम सप्ताहच काही प्रमाणात अनुकुल होईल. या राशीच्या साहित्यिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होण्यास काळ अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील. पण भावंडातील प्रेमसंबंधात बाधा येणे संभवते. जपा. शुक्राच्या अनुकुलतेने प्रशंसा होईल व काही प्रमाणात कौटुंबिक सुख व गृहसौख्य लाभेल. पण नंतर मात्र एकूण सर्वच ग्रहस्थिती फ़ारशी अनुकुल नसल्यामुळे मनस्तापच पदरी येणे संभवते. अशा प्रतिकुल काळात अत्यंत सहनशील बनून व मन आणि बुद्धीवर तबा ठेवून व जिभेला लगाम घालूनच सदैव आचरण करणे हितावह होईल. रात्रीनंतर दिवस उगवतोच; त्याप्रमाणे प्रतिकुल काळ व्यतीत होऊन अनुकुल काळ येतोच याची खात्री बाळगा. अशा विपरीत काळाचा उपयोग भावी अनुकुल काळात जे काही करावयाचे आहे त्याच्या योजना आखून ठेवा. शनि-राहू व रवि-मंगळामुळे स्वत:चे व जीवनसाथीचे सर्व प्रकारचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. वाद, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची समस्या, स्थावर संपत्तीबाबत चिंता अशापैकी कारणांनी कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. मंगळ-बुध या शत्रु ग्रहांमुळे मन, विचार व बुद्धी विकृत होण्याची शक्यता असते. मनात कुविचार येतात. त्यात कुसंगतीची बाधा झाल्यास काय होईल हे सूद्न्यास सांगणे न लगे. महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, उच्च बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकुल होईल. नंतर मात्र विपरीत काळाशी मुकाबला करावा लागेल. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(२) वृषभ -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव चंचल व लहरी होणे संभवते. यासाठी प्रयत्नपूर्वक मन व बुद्धी शांत, स्थिर राखण्याचा प्रयत्न केल्यास हातून अयोग्य असे काही घडणार नाही; व गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने महिन्याच्या पूर्वार्धात अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात गैरसमजाने वाद, भांडणे होणे संभवते. जपा. या महिन्याच्या काळात आरोग्यविषयक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. विशेष करून उष्णताविकार व वातविकारांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या काही मंडळीना कौटुंबिक खर्च भागविण्यासाठी जरूरीपेक्षा अधिक कष्ट-परिश्रम करावे लागतील. अविचाराने खर्च होणार नाही, याची काळजी घ्या. काही मंडळीना येणे असलेल्या धनाची चिंता लागणे संभवते. काही मंडळीना अनपेक्षित उद्भवणाऱ्या खर्चाची चिंता पडेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, द्रव पदार्थ विक्रेत्यांना, मानसिक रोग तज्न्यांना व शेती व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. सामान्य नोकरी-व्यवसाय असणारांना अस्थिर परिस्थितीशी मुकाबला करावा लागण्याची शक्यता आहे. दिनांक १० नंतर जन्मकुंडलीत योग असतील तर या राशीच्या काही मंडळीना अचानक धनलाभ होणे संभवते. पण दिनांक ११-१२ हे दोन दिवस आर्थिक व्यवहार जपून करा. मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना

परधर्मीयांकडूनच अधिक अर्थलाभ होणे संभवते. या राशीच्या उच्च शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व विद्यार्थ्यांना विविध अडचणींना तोंड देऊनच अपेक्षित प्रगती साधावी लागेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

(३) **मिथुन-** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव संतापी, हट्टी, हेकट असा होण्याची शक्यता आहे. तसे घडले तर अकारण श्रम, दगदग होऊन निष्पन्न काहीच होणार नाही. म्हणून मन व बुद्धीवर ताबा ठेवून व सहनशीलतेने आचरण केल्यास गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने आरोग्य उत्तम राहील व सर्व सुखाचेच होईल. सद्वर्तनी व बुद्धिमान मित्रांच्या सहवासात राहिलात तर तुमच्या आचरणात नकळत बदल होईल. आप्तेष्टांशी वाद, भांडणे होणे टळेल. त्याचा लाभ महिन्याच्या उत्तरार्धात होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होतील. वरिष्ठ अधिकारी तुमच्या कर्तृत्वाची प्रशंसा करतील. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असेल त्यांना यश प्राप्त होईल. अन्य शिक्षण क्षेत्र व साहित्य निर्मिती क्षेत्र, वकिली-सल्लागारी क्षेत्र, अकौन्टन्सी, शेतीवाडी, कमिशन, दलाली व्यवसाय अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणार असले तरी संततिविषयक समस्या मनस्ताप देणे संभवते. पण समजूतदारपणे वागून व समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन आचरण केलेत तर अशा समस्येचा त्रास होणार नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग, त्रागा करू नये. गुरु-नेपच्यून शुभ योगामुळे आध्यात्मिक ओढ असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती लाभू शकेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना जडत्व, आळस, शिक्षणेतर गोष्टींचा ओढा, नैराश्य, आजारपण अशापैकी कारणांमुळे अपेक्षित शैक्षणिक प्रगती करण्यात अडथळे निर्माण होणे संभवते. श्रद्धेने केलेली गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

(४) **कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. कारण रवि-मंगळ-शनि-राहू हे महत्त्वाचे ग्रह प्रतिकुल आहेत. अशा प्रतिकुल काळात मन व बुद्धीवर ताबा ठेवून तसेच जिभेला लगाम घालून सदैव आचरण करणेच सुखाचे होईल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जुनी मनस्ताप देणारी प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप होईल. जपा. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उपासनेत काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल व मनाला दिलासा मिळेल. आपली राशी ही गुरु ग्रहाची उच्च राशी असून सध्या गुरु ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल आहे. या महिन्याचे पहिले दहा दिवस शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख मिळू शकेल. नंतर हाच शुक्र नोकरी-व्यवसायास प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून कलेशी संबंधित व्यवसाय असणारांना काळ अधिक लाभदायक होईल. शास्त्रीय संशोधन व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक होईल. दूरच्या किंवा परदेशगमनाची संधी मिळू शकेल. पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी विशेष जपावे. करण जलभय, विषभय संभवते. या राशीच्या युवकांनी सध्या नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे ती नोकरीच मनापासून करावी. या राशीच्या सुखस्थानी असलेले शनि-राहू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच मातेशी न पटणे, मातेस कसला तरी त्रास असणे यामुळे मन अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमाने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा" चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवि-मंगळ-बुध-हर्षल व काही प्रमाणात नेपच्यून हे पाच ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी बुद्धी विकृत होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच मनावर व बुद्धीवर ताबा ठेवून सनशीलतेनेच आचरण करावे. तेच सुखाचे होईल. नपेक्षा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. अस्वस्थ मन व असह्य मनस्ताप यांमुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या पुरुषांना स्त्रियांपासून त्रास होणे संभवते, जपा. आचरणविषयक काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच गैरसमज, मानहानी, भांडणे होणे, नियोजित कार्यात अडथळे येणे संभवते. त्यामुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणेही शक्य दिसते. सतत सावधानतेनेच सर्व व्यवहार व आचरण करा. फ़सवणूक, अपघात भय संभवते. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, अर्थलाभही होईल व दिलासा मिळेल. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विवाहेच्छू वधूवरांचे विवाह ठरण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात अपेक्षित प्रगती साधणे शक्य होईल. बौद्धिक, शैक्षणिक कार्यक्षेत्र असणारांना, वकिली, सल्लागारी व्यवसाय, अकौन्टन्सी नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. दांपत्यजीवनातील सुखात व संततिसुखात काहीही कारणामुळे बाधा येणे संभवते. जपा. कुलदैवताच्या आणि गुरु दत्तात्रेयाच्या उपासनेने मनाला दिलासा मिळेल.

**(६) कन्या -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असला तरी विपरीत काळाला धैर्याने तोंड द्या. त्रागा करू नका. निराश होऊ नका. उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना मनातून काढून टाका. कौटुंबिक जीवनात अकारण, गैरसमजाने, मतभेदाने होणारे वाद, भांडणे शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करा. भावविचारांवर ताबा ठेवून व सहनशील बनून " मौनं सर्वार्थ साधनं " या वचनाचा अवलंब करून नम्रतेचे आचरण करा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने तुम्ही प्रतिकुल काळाशी यशस्वीपणे मुकाबला करू शकाल. तसेच कुटुंबात मानवी प्रयत्नाने घडणाऱ्या अनिष्ट घटना थोपवू शकाल. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेनेच करा. भावनेच्या भरात नको ते खर्च करू नका. नोकरी-व्यवसायात महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल; पण उत्तरार्धात परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे. नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल. व्यापार-व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. या राशीच्या युवकांना नवीन काही करावेसे वाटेल. पण सध्या तसा विचारही करू नका. भावी अनुकुल काळाचा लाभ घेण्यासाठी आपल्या योजना आखून ठेवून सिद्ध राहण्यास हरकत नाही. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, बौद्धिक संशोधन, शास्त्रीय संशोधन, शिक्षणक्षेत्र, अध्यात्म क्षेत्र अशा कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारीत गैरसमजाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. जीवनसाथीचे अनारोग्य वा विक्षिप्त आचरण यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात अडथळे निर्माण होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना व हनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " हनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले

तर बुध-गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने प्रतिकुल परिस्थितीवर मात करणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना वातविकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. मनस्ताप देणाऱ्या घटनांनीच शारीरिक आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना अकारण होणाऱ्या अपमानामुळे बेचैनी येईल. कुटुंबात कोणाचे स्थलांतर झाल्यामुळेही मन अस्वस्थ राहणे शक्य दिसते. अति विचार करू नका. डोकेदुखीचा त्रास होणे शक्य आहे. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रात व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगतीसाठी काळ अनुकुल असला तरी सतत गहन विचारात मग्न राहू नका. त्यामुळे क्वचित कोणास मेंदूविकार होणेही संभवते. जपा. काही मंडळीना मुदतीचा ताप येणेही संभवते. मनाला उभारी येण्यासाठी थोडे अध्यात्माकडे मन वळविलेत तर बरे होईल. आध्यात्मिक प्रगतीस काळ खूपच अनुकुल आहे. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध अधिक प्रगतिकारक व लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, वेतनवाढ, अधिकारपद मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या पूर्वार्धात शक्यतो प्रवास टाळा. महिन्याच्या उत्तरार्धात व्यवसायात अडथळे, अडचणी येणे संभवते. या राशीच्या युवकांना नवीन काही करण्याची तीव्र इच्छा होईल. पण सध्या आहे तीच नोकरी व्यवस्थित करा. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, कलात्मक व्यवसाय, औषधविक्रेते यांना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. मन व बुद्धी स्थिर राखू शकले तर या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शनि ग्रहाची साडेसाती आहे; तेव्हा संयम व सहनशीलतेने आचरण केल्यास गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने खूपच सुखाचे होईल. श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध सर्व दृष्टीनी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पहिल्या चार दिवसांत व दिनांक १४-१५ या दोन दिवशी मन व बुद्धी विकृत होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून, सहनशील बनून, साधकबाधक विचार करूनच आचरण करा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. नपेक्षा हातून नको ते घडू शकेल. आर्थिक फ़सवणूक होईल, मनस्ताप सहन करावा लागेल, मानहानी होईल अकारण मानसिक, शारीरिक कष्ट होतील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकारांचे आजार उद्भवतील. जपा. त्यातच वडीलमंडळीची सहानुभूती न मिळता विरोधच सहन करावा लागेल. सतत सावधानतेने आचरण करा. अस्थिभंग होणे संभवते. पाणी, वीज यांपासून अपघातभय आहेच. जपा. महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना इच्छाआकांक्षा पूर्ण करून घेण्यास काळ अनुकुल होईल. समाजातील वजनदार मंडळीच्या ओळखीतून विविध प्रकारचे लाभ होणे शक्य दिसते. सामान्य नोकरी असणारांनाही महिन्याचा उत्तरार्ध संतोषजनकच होईल. घरगुती जीवनात झालेले गैरसमज दूर होतील. कौटुंबिक सुख लाभेल. कला क्षेत्रातील मंडळीना व उच्च शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र शक्यतो प्रवास टाळा. त्रास व मानहानी होणे संभवते. जन्मकुंडलीत अचानक धनलाभयोग असेल तर या राशीच्या काही भाग्यवंत मंडळीना असा धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. दांपत्यजीवनातील सुखशांतीत विविध कारणांनी बाधा येणे संभवते. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. श्रद्धेने श्री गणेश

अथर्वशीर्षाचे व



श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ फ़ारसा अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. दांपत्यजीवनात दोघांचेही अनारोग्य, मतभेद, वाद यांमुळे मनस्ताप होणे संभवते. कोणाशी पटवून घेण्याची मनाची तयारी नसल्याने आहे त्या वर्तमान परिस्थितीत गृहसौख्य लाभेलसे वाटत नाही. अस्वस्थ मनस्थितीमुळे स्वभाव तक्रारखोर होईल. त्यामुळे काही झाले तरी सुख समाधान लाभणारच नाही. तेव्हा काळ प्रतिकुल आहे हा विचार मनात पक्का रुजवून व बुद्धीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण केलेत तर शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काळाची प्रतिकुलता सुसह्य होईल. रवि-मंगळ-हर्षल प्रतिकुल असल्यामुळेच शारीरिक आरोग्य बिघडून उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा, काहींना मूळव्याधीचा  तर काहींना मूत्राशयविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. अपघातभय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. वाहने सावधानतेनेच चालवा. बुध-गुरु-शुक्रामधील लाभयोगामुळे महिन्याच्या पहिल्या दहा दिवसांत अपेक्षित सुखसमाधान लाभेल; पण नंतर मात्र महिनाअखेरपर्यंत सहनशील बनून व मौन व्रत धारण करून काळ व्यतीत करणेच सुखावह होईल. मुलांपैकी कोणास कसला तरी त्रास असल्यामुळे संततिबाबत चिंता निर्माण होणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांनाही अनारोग्य, अभ्यासेतर गोष्टींचा मोह, नैराश्य अशापैकी कारणाने शैक्षणिक प्रगती करणे अशक्य होईल. जपा. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, शिक्षणक्षेत्र, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने विवाहेच्छूंचे विवाह होतील. किंवा प्रेमसंबंध, नवे स्नेहसंबंध जुळून येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपण मनापासून "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा" चे पठण करा. .

**(१०) मकर -**  या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले तरच ते शुभ ग्रहांच्या अनुकुलतेचा लाभ मिळवू शकतील. रवि-मंगळ हे ग्रह शारीरिक-मानसिक आरोग्याचे दृष्टीने प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णतेच्या विकारांचा असह्य त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काही मंडळीना अपचन, पोटविकार, मूत्राशयविकार अशापैकी एखाद्या विकाराचा असह्य त्रास होणे संभवते. काही मंडळीना ताप येणे, अंगावर फ़ोड येणे, दुखापत होणे, रक्तविकार वा ह्रदयविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. त्याशिवाय अपप्रचार, सतत मनाविरुद्ध घटना घडणे, जीवनसाथीचे अनारोग्य किंवा दोघांतील मतभेद, वाद, अन्य कटकटी यांमुळे असह्य मनस्ताप होऊन नैराश्य येणे संभवते. पण शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. दिनांक १२-१३ या दोन दिवशी अविस्मरणीय असे साधकबाधक अनुभव येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ बरा जाईल. जन्मकुंडलीत गुरु-शुक्राची अनुकुलता असेल तर काही भाग्यवान मंडळीना भूमिलाभ, धनलाभ, मानाचे पद वा कीर्ती-प्रसिद्धी असे काही प्राप्त होऊ शकेल. वकिली-सल्लागारी व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, वैद्यकीय संशोधन व्यवसाय, शास्त्रीय संशोधन व्यवसाय, लोखंड व्यापार-व्यवसाय, कोळसा विक्रेते अशा मंडळीना काळ अनुकुल व लाभदायक

होईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज, मतभेद आदि कारणांनी



भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या काही भग्यवान मंडळीना परदेशगमन योग संभवतो. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे "श्रीहनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात मानसिक-बौद्धिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेलसे दिसते. विविध कारणांनी मन अस्वस्थ, कोमल, उदास राहीलसे दिसते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी लगेच नैराश्य येण्याची शक्यताही जाणवते. बुद्धीही अस्थिर, विकृत होऊन अविचाराचे आचरण होणे संभवते. जपा. जिभेला लगाम घाला. विचारपूर्वक खर्च करा. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुधाच्या अनुकुलतेने शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना विरोधकांवर मात करणे शक्य होईल. हितशत्रू पराभूत होतील. अर्थलाभ होणेही संभवते. सामान्य नोकरदार मंडळीनाही महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेते, तांत्रिकतांत्रिक व्यवसाय, व्यापारी यांनाही महिन्याचा पूर्वार्धच प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र वरील पथ्ये पाळावी लागतील. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक अनारोग्य होणे संभवते. ताप येणे, अपचन होणे, पोटविकार बळावणे, इजा होणे संभवते. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. याशिवाय अपप्रचार, आर्थिक नुकसान, चोरी होणे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप होण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळीना कुसंगतीचा त्रास होईल. स्वतःच्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा कसल्या तरी मानसिक त्रासामुळे वैवाहिक जीवनातील सुखात व कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य दिसते. जपा. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना मन शांत व बुद्धी स्थिर राखून अध्ययन करणे जमले तर शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. श्रद्धेने श्रीगुरुदेवदत्तात्रेयाची उपासना करा व हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन** - या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत लहरी, चंचल, अस्थिर असा घडण्याची शक्यता आहे. कोणी दिलेला सल्ला, उपदेश, मानवणार नाही. त्यामुळे कोणाशीच पटणार नाही. त्यात नातेवाईक मंडळीचा त्रास, कौटुंबिक गैरसमज, वाद, भांडणतंटे यांची भर पडण्याची शक्यता दिसते. राहत्या जागेबाबतचे वाद असतील तर गृहसौख्य कसे लाभणार ? मनस्ताप होऊन अनारोग्य होण्याचीच शक्यता दिसते. क्वचित कोणास मोठा आजार होणेही शक्य आहे. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख, मित्रसुख लाभू शकेल. काही मंडळीना स्थावर खरेदीचे योगही येतील.. नोकरीत महिन्याच्या पूर्वार्धात वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच अपेक्षाभंग होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती पालटेल. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व सुखसमाधान लाभेल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व गुप्त पोलीस खात्यातील मंडळीना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. शुक्र ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर जीवनसाथीचे अनारोग्याबाबत उपाययोजना करावी लागेलसे दिसते. संततिसुखाचे दृष्टीने महिन्याचा उत्तरार्ध तापदायक होण्याचीच शक्यता दिसते. मुलांपैकी कोणाचे आजार, कोणाची आचरणविषयक समस्या यांमुळे त्रस्त व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी मन व बुद्धी शांत ठेवावी व अकारण दगदग करू नये. दररोज नियमितपणे " बावन्न

श्लोकी गुरुचरित्रा" चे पठण करा.

=====00000=====